महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : आरएलवाय-०१०९/१०५८/प्र.क्र.२१२/परिवहन-५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २३ डिसेंबर, २००९.

प्रस्तावना :- देशातील रेल्वे प्रकल्पासाठी फार मोठ्या प्रमाणात खर्च अपेक्षित असून एकट्या भारतीय रेल्वेला एकट्याने खर्च करून प्रकल्प पूर्ण करणे शक्य होत नाही. राज्यशासन, ज्या रेल्वे प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५० % अथवा जास्त सहभाग देण्याची सहमती देईल ते प्रकल्प भारतीय रेल्वे ३ वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करील असे केंद्र शासनाने राज्य शासनास कळविले होते.

राज्यातील ग्रामीण विशेषतः अविकसित भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी व लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेवून अशा प्रकल्पामध्ये राज्य शासनाने काही प्रमाणात सहभाग देण्याचे धोरण स्विकारले आहे.

शासन निर्णय :- राज्य शासनाने रेल्वे प्रकल्पामध्ये काही प्रमाणात सहभाग दिल्यास राज्यातील [illegible] प्रकल्प मार्गी लागतील ही बाब लक्षात घेऊन अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ या नवीन रेल्वे मार्ग उभारण्याच्या प्रकल्पामध्ये राज्य शासनाने ५० टक्के सहभागासंदर्भात दिनांक १८ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

प्रकल्पाचे नाव	प्रकल्पाची एकूण किंमत	राज्य शासनाचा सहभाग	रोजगार हमी योजनेच्या कामाद्वारे होणारा खर्च	राज्य शासनाकडून देय रक्कम (रोखीने)
१	२	३	४	५
अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ (२६१.२५ कि.मी.)	रुपये १०१० कोटी	एकूण खर्चाच्या ५० टक्के रुपये ५०५ कोटी	एकूण खर्चाच्या १२ टक्के रुपये १२१.२० कोटी	रुपये ३८३.८० कोटी

२.	नवीन रेल्वे मार्ग उभारण्याच्या कामापैकी मातीकाम व खडीकाम यासाठी एकूण प्रकल्पाच्या खर्चापैकी सुमारे १२ टक्के खर्च होणार असल्याने, सदर खर्च रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करून उर्वरित रक्कम अर्थसंकल्पीय तरतुदीव्दारे ३ वर्षात टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात यावी

३.	केंद्र शासनाने सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीच्या संपादनाबाबत तात्काळ कार्यवाही पूर्ण करावी, त्याचप्रमाणे आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करावी.

४.	सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने त्यांच्या हिश्श्याच्या रकमेची तरतूद पुढील ३ वर्षात उपलब्ध करावी.

५.	महाराष्ट्रातील रेल्वे विकासासाठी सन २००९-२०१० या वर्षासाठी रु.[illegible] कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद मासिक निधी विवरणपत्रानुसार टप्प्याटप्प्याने रेल्वे मंत्रालयास उपलब्ध करून देण्यात येईल. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मुख्यलेखाशिर्ष ३००१, भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व इतर संकीर्ण संघटना, (००) ८०० इतर खर्च, (००)(०२) रेल्वे प्रकल्पांमध्ये राज्य शासनाचा सहभाग (३००१००५४), ३२ अंशदाने.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग/वित्त विभागाच्या मान्यतेने व त्यांच्या अनौ. संदर्भ अनुक्रमे क्र. ३४२ / १४६१, दिनांक ०३.१२.२००९ व विवि/शिकाना/३४३, दिनांक २२.१२.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(शि. ना. मानेकर)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
संबंधित जिल्हाधिकारी,
महाव्यवस्थापक, मध्ये रेल्वे, मुंबई / दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद

मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (नियोजन विभाग)
प्रधान सचिव (वित्त विभाग)
सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक
महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी, नागपूर
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
निवडनस्ती (परि-८) गृहविभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.